ढग गड गड गड
पाऊस पड पड पड
अजगर सळ सळ सळ
अमर पळ पळ पळ

---

झटकन वर चढ
एक अननस आण
परत वर चढ
एक फणस आण

---

हा पहा ससा आला
ससा बघा ससा
कसा पळत पळत आला
कापसासारखा मऊ मऊ कसा
गाजर खात खात आला
वारा आला. पानाचा आवाज झाला.
ससा घाबरला. ससा झटकन पळाला.

---

बर वाटत का?
नाक लाल लाल झाल.
आई कपाळाला हात लाव.
मला ताप आला
अंग गरम गरम लागत.
आई औषध आण

तोंडी परीक्षा १_पहिली वाचन

Level 1 -- Reading Passages

## चमचा आण. औषध ओत.

## चादर ओढ. नीज आता.

## खरच मग ताप पळाला

–––––––––––––––––––––––––––––––––––––
––––

अभय भरभर चल

अजय पटकन पळ

अभय बदक धर

हरीण पकड

अजय कमळ बघ

खडक ढकल

### <u>ससा</u>

आला आला ससा आला

असा कसा ससा आला

धावत धावत आला ससा

ससा आला कसा बसा

घाबरा घाबरा माझा ससा

कावरा बावरा माझा ससा

छान छान माझा ससा

पहा ससा आता हसा

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या .

(प्रत्येकी गुण ३ )

१. अभय काय धरणार आहे ?

२. अजय काय बघत आहे ?

३. खडक कोण ढकलणार आहे ?

४. ससा कसा आला?

५. ससा कसा आहे ?

## **चिमणी**

चिव चिव चिमणी

बाळाला दिसली

बाळ उभा राहिला तशी

पटकन हसली

चिव चिव चिमणी

चिमणी माझी राणी

चिव चिव चिव चिव

चिमणीची गाणी

पिवळी पिवळी डहाळी

निळा निळा झरा

चिमणीला बाळ घाली

हिरवा हिरवा चारा

## **ओढा**

ओढा वाहतो

झुळूझुळू झुळूझुळू

पाणी पळते

हळूहळू हळूहळू

खालील प्रश्ना ंची उत्तरे वरील उतारा वाचून द्या .
(प्रत्येकी गुण ३ )

१. चिमणी कोणाला दिसली ?
२. चिमणीने बाळाला बघून काय केले ?
३. चिमणी गाण कस म्हणते ?
४. चिमणीला बाळ काय देतो ?
५. ओढा कसा वाहतो ?

## रंग

ढग आभाळी जमती
भरून येता गडगडती
ढग होता काळे निळे
धो धो पाऊस कोसळे
छोटा मोठा फळा
पाटी सारखा काळा
खडू खाऊन सारा
मधेच होतो गोरा

## जेवण

असरट पसरट केळीचे पान
चिंगीने केले जेवण छान
काढला केर धुतले हात
घेतले पाणी मांडले ताट
वरण भात लिंबाची फोड
भाजी पुरी बासुंदी गोड

कोशिंबीर ताटात कढी वाटीत

बाळांनो सगळे जेवण करा खुषीत

खालील प्रश्नांची उत्तरे वरी ल उतारा वाचून द्या .

(प्रत्येकी गुण ३)

१. ढग कुठे जमा होतात ? ढग जमा झाल्यावर काय होते ?

२. काळ्या रंगाचे काय काय आहे ?

३. चिंगीने काय केले ?

४. चिंगीने जेवणात काय बनवले ?

५. चिंगीने कढी कश्यात वाढली ?

---

आजोबाची काठी कशाची? लाकडाची.
आईची पिशवी कशाची? कापडाची.
अजयची वही कशाची? कागदाची.
मऊ मऊ उशी कशाची? कापसाची.

---

घराजवळ सुंदर बाग होती. उंच उंच नारळाची झाडे, हिरवेगार गवत व वासाची फुले. सगळीकडे लाल, केशरी आणि गुलाबी रंगाचे गुलाब होते. बागेत झोपाळे, घसरगुंडी व अनेक बाक होते. मुलांना या बागेत खेळायला मजा येते.

प्रश्न

१) बाग कुठे होती?

२) बागेत कोणती झाडे होती?

३) बागेत कोणत्या रंगाचे गुलाब होते?

४) बागेत मुलांना खेळण्यासाठी काय होते?

५) मुलांना मजा का वाटते?

---